सकाळ

# 'डिजिटल लिटरसी'वर डॉ. भानारकर यांचे मार्गदर्शन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागातील प्रा. डॉ. एम. के. भानारकर यांचे 'डिजिटल लिटरसी' विषयावर नुकतेच व्याख्यान झाले. शिक्षणशास्त्र विभागात इंडक्शन प्रोग्रॅमअंतर्गत व्याख्यान झाले. डॉ. भानारकर यांनी सध्याच्या युगात डिजिटल उपकरणांचा दररोजच्या व्यवहारात कसा उपयोग करायला पाहिजे, कसा केला जातो व जगात डिजिटलचे महत्त्व कसे आहे, याचे विश्लेषण केले. भारत सरकारचे डिजिटल लिटरसीबाबत काय धोरण आहे, हे स्पष्ट केले. फायनान्स, उद्योग, शिक्षण व व्यवहार यासाठी डिजिटली शिक्षित होणे काळाची गरज आहे, हे पटवून दिले. डिजिटल लॉकर सिस्टीम व डिजिटल भारत याची माहिती दिली. याप्रसंगी शिक्षणशास्त्र विभागप्रमुख प्रा. पी. एस. पाटणकर, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. जी. एस. पाटील, डॉ. विद्यानंद खंडागळे उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
15/10/2018 Page No. 6

लोकमत

## महत्त्वाचे

# विद्यापीठात आज दिवाळी अंकांचे प्रदर्शन

कोल्हापूर : वाचन प्रेरणा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आज, सोमवारी दुर्मीळ दिवाळी अंकांचे प्रदर्शन आणि संगणकीकृत वाचक प्रणालीचे उद्‌घाटन होणार आहे. विद्यापीठातील ज्ञानस्त्रोत केंद्रामधील या प्रदर्शन आणि प्रणालीचे उद्‌घाटन सकाळी साडेदहा वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2018
तरुण भारत

# शाहू महाराजांचे कार्य अलौकिक : रिचर्डसन

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्या काळात जगभरातील महिलांमध्ये नुकतीच सक्षमीकरणाची जाणीव मूळ धरण्यास सुरवात झालेली होती, त्या काळात महिलांसाठी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा करणारे कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य अलौकिक स्वरुपाचे आहे, असे प्रतिपादन ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या प्रथम महिला कुलगुरू लुईस रिचर्डसन यांनी मुंबई येथे केले.

ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या आठशे वर्षांच्या इतिहासात श्रीमती रिचड्र्सन यांच्या रुपाने कुलगुरूपद भूषविण्याची संधी महिलेस प्रथमच मिळाली आहे. त्या नुकत्याच भारत दौऱ्यावर आले आहेत. मुंबईतील ब्रिटीश कमिशनरेटमध्ये भारतातील शिक्षण क्षेत्रातील निवडक मान्यवरांशी त्यांनी संवाद साधला. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा समावेश होता. या भेटी दरम्यान कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कुलगुरू रिचड्र्सन यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा चरित्रग्रंथ भेट दिला आणि त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याविषयी त्यांना माहिती दिली. यावर



कोल्हापूर : ऑक्सफर्डच्या कुलगुरु लुईस रिचडर्सन यांना शाहू महाराजांचा चरित्रग्रंथ भेट देताना कुलगुरु डॉ. शिंदे.

कुलगुरू रिचड्र्सन म्हणाल्या, भारतातील एखाद्या महान समाजसुधारक राजाविषयी मला भेट मिळालेले हे पहिलेच पुस्तक आहे. शाहू महाराजांचे कार्य हे काळाच्या पुढचे आहे. हा संपूर्ण ग्रंथ मुळापासून वाचण्याची आता ओढ लागली आहे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. कुलगुरू डॉ. शिंदे हे ऑक्सफर्ड विद्यापीठाचे मानद प्रोफेसर असून गतवर्षी त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात तेथील शास्त्रज्ञांसमवेत सुमारे महिनाभर संशोधनकार्य केले आहे.

15 OCT 2018
Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Bharati Vidyapeeth secures platinum award in technical institute survey

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Bharati Vidyapeeth College of Pharmacy has secured platinum award in the AICTE-CII industry linked technical institute survey 2018 in the self-financed category, read the college's press statement.

It said that on October 5, the first report of the AICTE-CII industry linked technical institute survey was announced in the categories of Engineering, Ma-

CAMPUS BUZZ

nagement, Pharmacy and Architecture. It aims to rank institutes on objective parameters, which can help in promoting healthy competition among the institutes.

It further added that this survey, which has been developed by the AICTE-CII in close consultation and coordination with the AICTE, serves a different purpose — that of mapping the industry linkages of institutes. Its objective is different from government ranking, which is meant to inform parents about the performance of institutes. The purpose of this survey was to inform industry about the best institutes to scout talent from.

File Photo



The purpose of this survey was to inform industry about the best institutes to scout talent from

**Lecture on digital literacy:** M K Bhanarkar, assistant professor at the Department of Electronics of the Shivaji University, Kolhapur (SUK) delivered a lecture on the digital literacy in the Education Department earlier last week.

**Alumni get-together at varsity:** SUK has called for an alumni get-together on October 20 at its premises. According to the varsity officials, these kinds of events are necessary as they bring together the alumni, who can offer guidance to the present students as well.

**Awareness programme under 'Beti bachao':** A one-day awareness program on the 'Protection of Children from Sexual Offences Act' and Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques Act was held last week at the varsity premises under the 'Beti bachao' initiative.

**Vachan prerna din to be celebrated today:** SUK will celebrate its Vachan prerna din on Monday, October 15 at its premises. The varsity has appealed to students as well as citizens to be a part of this event.

**Career guidance workshop conducted:** A career guidance workshop was conducted last week at the SUK hostels by the varsity's centre for career guidance and psychological counselling.

**46 farmers enrol for sericulture course:** 46 farmers have enrolled for the sericulture diploma course at the SUK's department of zoology. In the first batch last year, only 23 had participated. The six-month course is run on weekends and has a fees of Rs 10,000.